दोन शब्द.....

हॅलो मेडिकल फाउंडेशन ही संस्था मराठवाडयाच्या ग्रामीण विभागात प्रामुख्याने उस्मानाबाद जिल्हायात आरोग्य, महिला विकास व त्यातून महिलांचे सबलीकरण इत्यादी क्षेत्रात कार्य करीत आहे. या संस्थेचे सावधान कला पथक समाजातील अंधश्रध्दा, रुढी, परपंरा दूर करुन सामाजिक जागृती आणि समाज प्रबोधन घडवून आणण्यासाठी ग्रामीण भागात कार्यक्रमाचे आयोजन करीत असते. कला पथकाच्या या विविधरंगी कार्यक्रमासाठी संयोजकांनी आणि कलावंतानी चोखंदळपणाने अनेक गीतांची निवड केलेली आहे. कलापथकाच्या विविध कार्यक्रमांना रंगत आणणारी ही गीते या परिसरात बरीच लोकप्रिय झालेली आहेत. रुढी, परंपरा, अंधश्रध्दा, अज्ञान या सामाजिक दोषांचे दिग्दर्शन करीत लोकाशिक्षणातून, मनोरंजनातून सामाजिक परिवर्तन घडविण्याच्या कार्यात या गीतांचा महत्वाचा वाटा आहे. खेडयापाडयातील सर्व लोकांपर्यंत ही गीते पोहंचवीत या भावनेने हॅलो मेडिकल फाउंडेशनने ही निवडक गीते पोहंचावीत संग्रहाच्या रुपात आपल्या सारख्या रसिक जनांच्या हाती देण्याचे ठरविले आहे लोकविकास साधण्याचे एक महत्वाचे अंग म्हणून संस्थेच्या कला पथकाच्या या उपक्रमाचे स्वागत होईल अशी अपेक्षा आहे.

गीत जागर

# ❋ अनुक्रमणिका ❋


१. सावित्रीचं नमन
२. पणती जपून ठेवा
३. चलाबाई चला एकजूट करा
४. युगा युगाची गुलामी चाल
५. या देशाच्या आया बायांना
६. धरणं
७. निर्भिड बना गं
८. जातं
९. डोळं तुमचं डोळं
१०. तोड मर्दा तोड ही चाकोटी
११. डोंगरी शेत माज गं मी येनू किती
१२. ले मशाल चल पडे है
१३. इसलिए राह संघर्ष की
१४. गीत गा रहे है आज हम
१५. होंगे कामयाब
१६. बेटी हूँ मैं
१७. देश भक्त लोक तुम्ही ना
१८. घर असावे
१९. पत्रात मजकूर
२०. व्यसनमुक्ती अभियान
२१. अमृताची गोडी
२२. तुफानातले दिवे
२३. जलस्वराज्य
२४. हगंदारीमुक्त गाव, निरोगी गाव
२५. अमन के हम रखवाले
२६. काट्या कुट्याचा रस्ता
२७. बुध्द, कबीर, भीमराव, फुले
२८. साक्षरता गीत
२९. देह मंदीर चित्त मंदीर
३०. जमा खर्च स्वातंत्र्याचा
३१. जात कोणती पुसू नका
३२. आभाळाची लेकरे
३३. लहू का रंग एक है
३४. साथियों सलाम
३५. संघटना गीत
३६. भान कुठं विसरून

# * झेंडा उंचा रहे हमारा *

विजयी विश्व तिरंगा प्यारा
झेंडा उंचा रहे हमारा ॥ धृ ॥

सदा शक्ती सरसानेवाला
प्रेमसुधा बरसानेवाला,
विरोंको हर्ष आनेवाला
मातृभुमिका तनमन सारा ॥ १ ॥

शान न इसकी जाने पाये,
चाहे जान भले ही जाए,
विश्वविजय करके दिखलाए,
तब होवे प्रण पूर्ण हमारा,
झेंडा उंचा ...... ॥

– साने गुरूजी



# * झेंडा उंचा रहे हमारा *

इतनी शक्ती हमें दे न दाता
मन का विश्वास कमजोर हो ना
हम चले नेक रस्ते से हम से
भुल करभी कोई भुल हो ना ॥ धृ ॥
दुर अज्ञान के हो अंधेरे
तु हमें ज्ञान की रोशनी दे,
हर बुराई से बचते रहे हम
जितनी भी दे भली जिंदगी दे ॥
बैर होना किसीका किसीसे
भावना मन में बदले की होना,
हम चले नेक रस्ते से हमसे
भूल कर भी कोई भूल होना ॥ १ ॥
हम न सोचे हमे क्या मिला है
हम ये सोचे किया क्या है अर्पण
फूल खुशीयों के बाँटे सभी को,
सबका जीवन ही बन जाए मधुबन,
अपनी करूणा का जल तू बहाके
कर दे पावन हर एक मन का कोना,
हम चले नेक रस्ते से हमसे
भूल कर भी कोई भूल होना ॥ २ ॥
इतनी शक्ती हमें ......

# ∗ सावित्रीचं नमन ∗

पहिली माझी ओवी ग, सावित्रीच्या बुध्दीला
स्त्रियांच्या शिक्षणाचा पाया तू घातला
अशिक्षित आडाणी तू, पतीपाशी शिकली
मुलीसाठी पहिली शाळा, तुम्ही हो काढली ॥१॥
दुसरी माझी ओवी ग, तुझ्या गं धैर्याला
दगड गोटे खाऊनी, चालवली तू शाळा
घराबाहेर काढले, गुंडानी अडविले
धीराने तोंड दिले, सगळ्या त्रासाला ॥२॥
तिसरी माझी ओवी ग, तुझ्या मोठया मनाला
फसलेल्या विधवेचा, सांभाळ तू केला
अनाथ नि अबलाचे, मायबाप होऊनी
यशंवत बाळाला, दत्तक घेतला ॥३॥
चौथी माझी ओवी ग, तुझ्या थोर ह्यदयाला
माणुसकीचा झरा त्यात, नित्य गं राहिली
सत्यधर्म प्रकाशात, तेजांन तळपली ॥४॥
दुः खितांच्या सेवेत, देह तू ठेविला
स्मरण तुझे करुनी, वसा मी घेतला
भगिनीना जागवीन, संघटित करीन
ज्ञानज्योत लावीन, हेच तुला नमन ॥५॥

– वसुधा सरदार





# ∗ पणती जपून ठेवा ∗

पणती जपून ठेवा, अंधार फार झाला
थोडा उजेड ठेवा, अंधार फार झाला ॥ धृ॥
आले चहू दिशांनी, तुफान विस्मृतीचे
नाती जपून ठेवा, अंधार फार झाला ॥ १ ॥
शिशीरातल्या हिमात, जे गोठतील श्वास
हृदये जपून ठेवा, अंधार फार झाला ॥ २ ॥
वणव्यात वास्तवांच्या, होईल राख त्यांची
स्वप्ने जपून ठेवा, अंधार फार झाला ॥ ३ ॥
काळया ढगात वीज, आहे पुन्हा टपून
घरटी जपून ठेवा, अंधार फार झाला ॥ ४ ॥
शोधात कस्तुरीच्या, आहेत पारधी हे
हरणे जपून ठेवा, अंधार फार झाला ॥ ५ ॥
ते वाटतील परके, आपुलेच श्वास आता
हातात हात ठेवा, अंधार फार झाला ॥ ६ ॥
हृदयात तेवणाऱ्या, जखमातूनीच आता
कंदिल एक लावा, अंधार फार झाला ॥ ७ ॥

– हिमांशू कुलकर्णी

# * युगा युगाची गुलामी चाल *

युगा युगाची गुलामी चाल
सांभाळीता चूल आणि मूल
दास्याचा तुरूंग फोडीते,
स्त्री दास्याचा तुरुंग फोडीते ॥ धृ॥
कायानू बायानू कोण्या म्हणून
बंधन घातलं, पोती लिहून
बायाची अक्कल, म्हणे गहाण
पुरूषी धाका सदा रहाण
मनुस्मृतीची होळी मी करीते ॥ १ ॥

बालपणामधी बापाचं नाव
लगीन झालं की, पती हा देव
म्हारातपणी पोरांना भ्यावं
अशा जीवनी सेवा हा भाव
बदलाया बंड मी करीते ॥ २ ॥

कामाला जाताना कमी मजूरी
उशीर झाला की धनी मुजोरी
जाती पातीची, खोल खोल दरी
गरीबाची सदा शिळी शिदोरी
गुलामीच्या बेड्या मी तोडीते ॥ ३ ॥





# * या देशाच्या आया बायांनो *

या देशाच्या बायांना, आया बहिणींना सांगाया जायाचं हाय गं
एकी करून, अन लढा पुकारून, ह्यो तुरूंग फोडायचा हाय गं ॥ धृ॥
या तुरूंगाच्या भिंती भिंती मधून, हाय लेकी सुनांना चिणल्यालं
आन् पिळणाऱ्या कायद्याच धागं घेऊन, जाळं गुलामगीरीच विणल्याल
त्या जाळ्यात अडकून, दबल्या मनात आता मरत रहायचं नाय गं ॥१॥
या तुरुंगाच्या चिऱ्या चिऱ्यावरती, हायती धर्माची गाणी लिव्हल्याली
माणसं माणसं फोडून एकली एकली झोडून, हाय कष्टाची कमाई गिळल्या
हात घशात घालून, त्यांना पालथ पाडून गेल समदं ते मिळवायचं हाय गं ॥
या तुरूंगाच्या इटे इटेसाठी, आपल्या रानातली माती हाय घेतल्याली
गावात दारू आणून, चिलीम गांजा पाजून, आपल्या पुरुषाची ताकद हाय मारल्य
आता म्होरं होऊन, दारू गुत्तं फोडून, समदी जमीन मागाया जायचं ॥३
या तुरूंगाची राखण करण्यासाठी, पाद्री मुल्लानी पुजारी बसल्याली
किल्ल्या हाती देवून, दंडा खांद्या लावून हायेत भांडवलदार, सावकार बसल्या
देव दासी चला, आदिवासी चला बौध्द दलीत पुढ्यात ऱ्हायचं ॥४॥

– माधव चव्हा

# * धरणं *

बाई मी धरण, धरण, धरण बांधिते
माझं मरणं, मरण, मरणं कांडिते ॥ धृ॥
झुंजू मुंजू ग झालं, पीठ जात्यात आटलं
कणी कोंडाग कोंडा गं कोंडा मी रांधिते ॥ १ ॥
दिस कासऱ्याला आला, जीव मागे घोटाळला
तान्ह लेकरू माझं लेकरू पाटीखाली मी डालीते ॥ २ ॥
काय सांगू उन्हाच्या झळा, घाव खाली फुटे शिळा
कढ दाटे गं, दाटे गं, पायी पाला मी बांधिते ॥ ३ ॥
पौरापेरात साखरं, त्यांच पिकलं शिवारं
घोट भर पाण्यासाठी, सारं रान मी धुंडाळिते ॥ ४ ॥
येल मांडवाला चढे, माझ्या घामाचे गं आळे
माझ्या अंगणी, अंगणी, पाला पाचोळा गं पडे ॥ ५ ॥

– दया पवार





# * निर्भिड बना गं *

एकीन एकएक निर्भिड साऱ्या बना गं
मर्दानी नार मी भिणारं नाही कुणा गं ॥ धृ ॥
सासूनं छळलय, नवऱ्यानं छळलय
छळलयं साऱ्या जगान
निर्भिड होऊ रणात येवू अभियानाच्या बळानं
अबला मी नाही गरजून सांगू जगा गं ॥ १ ॥
अन्याय साहून घरात राहून
गुमान नाही बसायचं
खांद्याला खांदा लावून आता सन्मानाने जगायचं
हक्कासाठी लावू प्राण पणा गं ॥ २ ॥
नारीची मुक्ती झालीच पाहिजे
जगाला पटवून सांगायचं
अभियानाची ऐकून गाणी, झाशीची राणी बनायचं
लढू या घेऊन सावित्रीच्या आना गं ॥ ३ ॥

## * जातं *

घर घरतय गं जातं, या पहाटच्या गं पारं
पीठ जात्यानं ग जसं, दुःख डोळ्यान गं झर ॥ १ ॥
काम काम बघू, काम कुठचं भेटेना
या पोटातली आग, आग कुठचं इजना ॥ २ ॥
खडी ग मी आता, आता किती फोडू बाई
पगार पडना, किडकी जवारी मी खाई ॥ ३ ॥
कपाळीचा घाम, घाम किती पुसू बाई
या बाटलीनं नेली सारी धुवून कमाई ॥ ४ ॥
शाळंचा गुरूजी, कागं बाळाला कोपला
अन् बाळ माझा एक, एक यत्ता गं चुकला ॥ ५ ॥
शिवू शिवू कुठं, सारं आभाळ फाटलं
अन् तान्हं बाई माझं ओल्या डोळ्यांनी निजलं ॥ ६ ॥
या गं या बायानो, जीव व्याकुळसा होई,
हात लावागं हाताला, जातं या पहाटेच्या गं पारं
हात लागता हाताला पीठ येई झरझर

– रो.ह.यो. वरील भगीनींनी तयार केलेले गीत





## * डोळं तुमचं डोळं *

डोळं तुमचं डोळं
तुमच्या डोळ्याची मला भिती
खाली बघूनी चालू किती ॥ धृ ॥
माझ्या आईची शिकवण मला
नाही डोळ्या कधी डोळा दिला
तुमचे डोळे प्रश्न पुसती ॥ १ ॥
मी कुमारी की श्रीमती
की आहे सौभाग्यवती
मी कुणाच्या मालकीची
तुमचे डोळे प्रश्न पुसती ॥ २ ॥
नाव सांगूनी भागत नाही
तुम्हा हवयं आडनावही
आडनावातगं बाई
साऱ्या लपल्या जाती पाती ॥ ३ ॥

– ज्योती म्हापसेकर

# तोड मर्दा तोड ही चाकोरी

तोड मर्दा तोड ही चाकोरी, तोड बाई तोड ही चाकोरी
मुक्तीचं गीत म्हणा रात हाय अंधारी ॥ धृ ॥
गावापासून त्या शहरापातूर, बायापासून आमच्या पोरापातूर
सर्वांना मातीशी इमान हाय रं, तरी बी चुल का गुमान नाय रं ॥ १ ॥
कुणाची शेतं नी कुणाची भातं
आपण जात्यात, जाणार हाय रं
इतिहास खोटं कधी बोलणारा नाय रं ॥ २ ॥
सूर्याचा प्रकाश सर्वा समान
धरणीच्या पोटातलं पाणी समान
फिरणारा वारा सर्वा समान हाय रं ॥ ३ ॥
दिल्लीच्या वाटला कुपान हाय रं
संसद नावाचं दुकान हाय रं
स्वातंत्र्य, स्वातंत्र्य, कशात हाय रं
रोटी मागेल त्याला बंदूक हाय रं ॥ ४ ॥
पिढ्यान पिढ्याचं ओझं पठानी, आजवर गायल्याती आसवाची गाणी
सुखाचं गाणं गळ्या फुलणारं हाय रं, रात्रीत मशाल पेटवायची हाय रं
आत्ताच मशाल पेटवायची हाय रं ॥ ५ ॥





# डोंगरी शेत माझगं मी बेनू किती

डोंगरी शेत माझगं मी बेनू किती
आलं वरीस राबून आम्ही मरावं किती ॥ धृ ॥
गवताचा भारा बाईगं, घेऊन चढाव किती
आडाचं पाणी बाईगं, पानी वढाव किती
घरात तान्हा माझागं, तान्हा रडला किती
तान्हाचं रडं ऐकून पान्हा येईल किती ॥ १ ॥
आलं आलं वरीस जमीन नांगरून
उभं पीक नाचे सोन्याचं फुलून
परि एक गेला सावकार ठोला
हिस्कून घेतो बाई सोन्याचा गोळा
उपाशी राहून गं आम्ही मराव किती ॥ २ ॥
म्हागाईनं बाई घातला हैदोस
गळा आवळी बाई बेकारी पास
कुणाचं देवू अन् कुणाचं ठेवू
अशीच वर्सावर वरीस जातील किती ॥ ३ ॥

# * ले मशाले चल पडे है *

ले मशाले चल पडे है, लोग मेरे गाँव के
अब अंधेरा जीत लेंगे, लोग मेरे गाँव के ॥ धृ ॥

पुछती है, झोपडी और, पुछते है खेत भी
कब तक लूटते रहेंगे लोग मेरे गाँव के ॥ १ ॥

बिन लढे कुछ भी यहाँ, मिलता नही ऐ जानकर
अब लढाई लढ रहे है, लोग मेरे गाँव के ॥ २ ॥

चिखती है हर रुकावट, ठोकरोके मारसे
बेडिया खनका रहे है, लोग मेरे गाँव के ॥ ३ ॥

लाल सूरज अब उगेगा, देश केहर गाँव मे
अब इकट्टा हो रहे है, लोग मेरे गाँव के ॥ ४ ॥





# * इसलिए राह संघर्षकी *

इसलिए राह संघर्षकी हम चुने, जिंदगी आसूओंमे नहाई न हो
शाम सहमी न होरात हो नाडरी,
भोर की आँख फिर डबडबाई नहो इसलिए........
सूर्यपर बादलोका न पेहरा रहे, समय आत्मा सबकी उबी न हो
यू नही इनाम फुटपाथपर हो खडा, हर समय आत्मा सबकी उबी न हो
आसमां मे टंगी हो न खुशहालीया
कैद महलोंमे सबकी कमाई न हो इसलिए........
कोई अपनी खुशी के लिए गै की
रोटिया छिन ले हम नही चाहते
छिठकर थोडा चारा खोई उम्रकी
हर खुशी छिनले हम नही चाहते
हो किसी के लिए मखमली बिस्तरा
और किसी के लीए एक चटाई न हो इसलिए.......
अब तमन्नोंफिर ना करे खुद्कुशी
ख्वाबकर खौफकी चौकसी ना रहे
श्रमके पावोंसे हो ना पडी बेडिया
शक्ती की पीठ अब ज्यादती ना सहे
दम ना तोडे कही भूकसे बचपना
रोटीयोंके लिए अब लढाई न हो इसलिए.........

– मेघा पाठकर

# * गीत गा रहे है आज हम *

गीत गा रहे है, आज हम, रागीणी को ढूंढते हुवे
आ गए यहाँ जवॉ कदम, मंजिलो को ढूंढते हुवे ॥ धृ ॥

अब दिलो मे ये उमंग है, ये जहॉ नया बनायेंगे
जिंदगी का तौर आजसे, दोस्तोंको हम सिखायेंगें
फूल हम नये खिलायेंगे, ताजगी को ढूंढते हुवे ॥ १ ॥

रोग की तरह दहेज है, आज देश मे समाज मे
है तबाह आज आदमी, लूट पर टिके समाज मे
हम समाज भी बनायेंगे, मानवोको ढूंढते हुवे ॥ २ ॥

फिर न रो सके कोई दुल्हन, जोर जुल्म कान हो निशान
मुस्कुरा धरापे गगन, हम रचेंगे ऐसी दास्तान
यू वतन को हम सजायेंगे, हर खुशीको ढूंढते हुवे ॥ ३ ॥





# * होंगे कामयाब *

होंगे कामयाब होंगे कामयाब
हम होंगे कामयाब एक दिन
ओहो मनमे है विश्वास पूरा है विश्वास
हम होंगे कामयाब एक दिन ॥ १ ॥
हम चलेंगे साथसाथ, डाले हाथों मे हाथ
हम चलेंगे साथ साथ एक दिन ......
होगी शांती चारो ओर
होगी शांती चारो ओर
होगी शांती चारो ओर एक दिन ......
होगी जीत सच्चाई की, होगी जीत सच्चाई की
होगी जीत सच्चाई की एक दिन .......
युग बदलेगा चारो ओर, युग बदलेगा चारो ओर
युग बदलेगा चारो ओर एक दिन .....
नही डर किसीका आज, नही भय किसीका आज
नही डर किसीका आज एक दिन......

## * बेटी हूँ मै *

बेटी हूँ मै बटी, मै तारा बनूँगी
तारा बनूगीं मै, सहारा बनूगीं ॥ धृ ॥

गगनपर चमके चंदा मै, धरतीपर चमकूँगी
धरतीपर चमकूँगी मै, उजियाला करूँगी ॥ १ ॥

पढूँगी लिखूँगी मै, मेहनतभी करूँगी
अपने पांवो चलकर दुनिया को देखूँगी
दुनियाको देखूँगी मै, दूनियाको समजूगीं ॥ २ ॥

फुल जैसा सुंदर बागों में खुलूँगी
तितली बनूँगी मै हवा को चुमूँगी
हवा को चुमूँगी मै, हवा में नाचूँगी ॥ ३ ॥
बेटी हूँ मै बेटी, मै तारा बनूँगी





## * देश भक्त लोक तुम्ही ना *

देश भक्त लोक तुम्हीना
त्याग आम्हा काय मागता ॥ धृ ॥
जंगल असे आमची आई, रक्षणात जीव जाई
झाडे तुम्ही तोडून टाकता, त्याग आम्हा काय मागता ॥ १ ॥

झोपडीत दिवा नाही,उजेड आमच्या गावात नाही
डोळया देखत,उजेड चोरता ॥ २ ॥

अन्न नाही पाणी नाही, डोळयामध्ये आसू नाही
तुमच्यासाठी धरणं बांधता ॥ ३ ॥

लढलो आम्ही देशासाठी,इतिहासात नाव नाही
राज्यावर तुम्ही बसता ॥ ४ ॥

आम्ही ज्यांची केली चाकरी
आमच्यासाठी नाही भाकरी
भकरीवर ताबा मागता त्याग आम्हा काय मागता ॥ ५ ॥

– आदिवासी गीत संग्र

# * घर असावे *

घर असावे घरासारखे
नकोत नुसत्या भिंती
तिथे असावा प्रेम जिव्हाळा
नकोत नुसती नाती ॥ धृ ॥
त्या शब्दाला अर्थ असावा,
नकोत नुसत्या नाणी
अश्रूतूनही प्रीत झरावी,
नकोत नुसते पाणी ॥ २ ॥
त्या घरटयातून पिल्लू उडावे,
दिव्य घेऊन शक्ती
आकांक्षाचे पंख असावे,
उंबरटयावर भक्ती ॥ ३ ॥
* विमल लिमये

– विमल लिमये





# * पत्रात मजकूर *

पत्रात मजकूर लिहतेगं आई, जिव्हाळयाचं माझ्या इथं कोणी नाही
टोचून बोले मला सासूबाई
आज मला छळतात हुंडयाच्या पाई ॥ धृ ॥
भल्या भल्या पहाटे मी, लवकर उठावे
तरी घरधन्याने, मजला पीटवे
घरकाम मी करते जरी, जाच मला गं खुप सासरी
लेक तुझी इकडे उपाशीच राही ॥ १ ॥
धाकटया दिराचा मला भारी धाक
जाळीनं म्हणतोय मला बिनधोक
चिंता मला पदोपदी, येथील कामं आई सांग कधी
जाळीयली माझी ती मोठी जाऊ बाई ॥ २ ॥
चुकले आहे गं खऱ्या वैभवाला
मुळी सुख नाही गं, माझ्या जीवाला
झुरते मगीन आई, तुझ्या गुणी,
झुरते मगीन आई येता आठवणी
सासरच्या नियती कशी सांगू आई ॥ ३ ॥
पाठीची बहिण मला घेऊन जा
गोविंद दादा मला पाहूनी जा
झुरते मनी गं आई तुझ्या गुणी
आज इथे माझ्या गं मरणाची घाई ॥ ४ ॥

– गोविं

# * व्यसनमुक्ती अभियान *

अभियान हे .... चाले गावोगाव,
व्यसनमुक्ती कार्य हे चाले गावोगाव,
संधी आली खरी, तुमच्या हो दारी,
ज्ञानगंगा गावोगाव ॥ धृ ॥
गावा गुटखा तंबाखु खाऊ नका,
कॅन्सर आजाराला संधी देऊ नका,
या व्यसनाला तुम्ही आता हकलुन लावा,
नका देवू त्याना हो वावं ॥ १ ॥
गावोगाव दारुचे दुकानं,
घर संसारचे होई नुकसान,
अहो दारु पिऊ नका, लाज अशी
टाकु नका, घेई संसाराचा ठाव ॥ २ ॥
व्यसनापाई संसार झाले उध्वस्त,
नवी पिढी ही होईल पुस्त
व्यसनमुक्तीचा आता तुम्ही घ्या एक ध्यास
राखा घराण्याचे या नावं ॥ ३ ॥
हलो परिवाराची विनंती तुम्हाला,
विसरु नका हो या वचनाला,
आज शपथ घेवू या सारे मिळूनी,
करु जागृत आपले गावं ॥ ४ ॥

– प्रबोध कांबळे





# * अमृताची गोडी *

अमृताची गोडी आईच्या दुधात,
अमृताची गोडी रे गोडी आईच्या दुधात ॥ धृ ॥
आईचे हे दुध मौल्यवान मेवा,
बाळं सुखी ठेवा पाजुनिया ॥ १ ॥
आईचे हे दुध जन्मतःच पाजा,
होईल गं ताजा सुंदर तान्हाला ॥ २ ॥
दुधातील चिकं हिच पाहिलसं,
पावतील नाशं शत्रू सहा ॥ ३ ॥
दुध भरपूर बाळं ओढी पान्हा,
लांबेल पाळणा आपोआपं ॥ ४ ॥
निसर्गाने बालकास जन्म,
दुध हेच अन्न त्याच्यासाठी ॥ ५ ॥
आरोग्य संपन्न बाळ ज्याचे घरी,
सुखी ते संसारी मायबापां ॥ ६ ॥
अमृताची गोडी आईच्या दुधात,
अमृताची गोडी रे गोडी आईच्या दुधात..

# * तुफानातले दिवे आम्ही *

तुफानतले दिवे आम्ही, तुफानातले दिवे
तुफान वारा, पाऊस धारा मुळी न आम्हा शिवे ॥ धृ ॥
हल्ल्यावरती होती हल्ले, अभंग आमुचे बाले किल्ले
असाच ताठर माथा आमुचा, जरा न खाली लवे, तुफानातले ॥ १ ॥
हाय बिचारा दुबळा वारा, निर्दयतेने करतो मारा
ह्या वाऱ्याने मावळणारी जात आमुची नव्हे, तुफानातले ॥ २ ॥
तथागताच्या चिरंतनातून, मानतेच्या कणाकणातून
भिमयुगाच्या निरांजनातून, तेल मिळावे नवे, तुफानातले.... ॥ ३ ॥
काळ्या धरणीवरचे काळे, काळाने विणलेले जाळे
करील काळे आपुले आता, काळ्या करणी सवे, तुफानातले.... ॥ ४ ॥
एक दिव्याने पेटविलेले, चरितेसाठी पाठवलेले
काळ्या रानी अखंड येथे, फिरती आमुचे थवे, तुफानातले.... ॥ ५ ॥
जळु परंतु धरती उजळु, प्रकाश येथे असाच उधळु
सदा चांदणे सुखी नांदणे, हेच आम्हाला हवे, तुफानातले... ॥ ६ ॥





# * जलस्वराज्य *

येतो दुष्काळाचा फेरा, त्याला साऱ्याने रोखूया ॥
पाणी अडवू जिरवू, चला मातीला रोखू या ॥ धृ ॥
सांग - सांग पोरी तुझं शिवार कसं
झाले उजाड हे रानं, पहा तुम्ही निरखून,
अन्न धान्याची टंचाई, कशी जाईल निघून,
झाडे लावू चारी बांधू पाणी शेतात मुरवूया ॥ १ ॥
सांग - सांग पोरी तुझं परिवार कसं,
पडेल पत्र्यावर पाणी, ते बी जाईल वाहूनी,
खोल खड्डा तो करुनी, पाणी त्याच्यात सोडूनी,
पडणार सारं पाणी, त्याचं पुनर्भरण करुया ॥ २ ॥
सांग सांग पोरी तुझं गाव कसं
जलस्वराज्य प्रकल्प, मिळे स्वच्छ शुध्द पाणी,
नियाजन आपण करुनी, करु अंमलबजावणी,
दहा टक्के लोकवाटा, आपण सारेच भरुया ॥ ३ ॥

- हॅलो मडिकल फाऊंडेशन

# * हगंदारीमुक्त गाव, निरोगी गाव *

मला नाही यायचं नांदायला हो,
मला नाही यायचं नांदायला ॥ धृ ॥
गाव हाय तुमचं बारा कोसं
उघड्यावर सारी संडासला बसं
रोगराई गावात आणायला हो ॥ १ ॥
गावात नाही संडास तुमच्या,
धोका होईल जीवाला माझ्या,
उघड्यावर संडासाला जाता बाई
डास, माशा होतात साऱ्या गावी,
डासाने होईल मला मलेरिया मला ॥ २ ॥
दिवसा जाता बाप्यांची भीती,
रात्री वाटे सापांची भीती
शौचाला जर का गेले नाही,
बध्दकोष्टतेला होते घाई
सोबत अपचन होईल मला ॥ ३ ॥
उघड्यावर संडासाला जाता बाई
पाणी सारं दुषित होई,
दुषित पाणी पिता बाई
जुलाबं,उलटी,कावीळ होई
पोलिओ होईल बाळाला ॥ ४ ॥
आपण बांधू शौचालय एक
दोन-चार हजारात होईल चक्क
सरकारचं धोरण होईल पक्क,
संडासला बाहेर जावू नको गं
मग तर येशील का नांदायला गं ॥ ५ ॥

– राजेश पाईकराव



गीत जागर

# * अमन के हम रखवाले *

अमन के हम रखवाले सब एक है एक है
जुल्म से लढने वाले सब एक है एक है ॥ धृ ॥
हम कोरीयामे हम है हिंदुस्थान मे
हम रुस में है चीन मे जपान मे
हम अमरीका मे हम है पाकिस्तान मे
हम है दुनियाके हर सच्चे इन्सान मे
हम क्या गोरे क्या काले सब एक है एक है ॥१ ॥
हम आजनता और ताज की फंकार है
हम पॅरीस और रोम की शृंगार है
हम चलती फिरती सडको की रफ्तार है
हम हसती गाती फॅक्टरी के गीत है
हम जीवन के उजयाले सब एक है ॥ २ ॥
हम बच्चोंकी मुस्कान बेचते नही
हम गावों की अरमार बेचते नही
ॲटम के सि डॉलर के बाजार मे
हम इन्सानोंके प्राण बेचते नही
आजादी के मतवाले सब एक है एक है ॥ ३ ॥
इन बस्तीयोंको जगमगाना यह सदा
इन खेती योंको लह लहाना यह सदा
उठाओ हात गीत गाओ अमन के
जिंदगी के गीत गाना है सदा
मौत मे हसनेवाले सब एक है एक है ॥ ४ ॥

## * काट्या कुट्याचा रस्ता *

काट्या कुट्याचा तुडवत रस्ता,
माझ्या गावाकडे चल माझ्या दोस्ता ॥ धृ ॥
इथं उन्हात-उन्हात राबत्यात्ती माणसं,
त्याच्या घामाचा भाव हाय सस्ता ॥ १ ॥
काळ्या बापाचं-हिरवं रानं
काळ्या माईनं-माईनं पिकवलं सोनं
इथं रानात घालाची गस्ता ॥ २ ॥
इथं डब्यात साखर लागते गोडं,
माझ्या बापाच्या-बापाच्या अंगाला फोडं,
भाव ठरला त्याला न पुसता ॥ ३ ॥
इथं दुष्काळ-दुष्काळ गिरट्या घाली,
माझ्या बापाच्या गावाला कुणी ना वाली,
गाव असून झाला तो फिरता ॥ ४ ॥
माझ्या........





## * बुध्द, कबीर, भीमराव, फुले *

बुध्द,कबीर भीमराव फुले। या भूमीवर जन्मले
त्यांनी जन जीवन फुलवीले गं, शेजारीन सखबाई ॥ १ ॥
देवाच्या नावावर, जेकरीती छूमंतर
ते भरती आपूली घरगं,शेजारीन सखबाई ॥ २ ॥
देव अंगातला बड बड मान हालवून हातहात उडं
मागतो बकरं कोंबड गं, शेजारीन सखेबाई ॥ ३ ॥
सुख देवच देतोय जिवा, पोरं मागशील देतो तवा
मग नवरा कशाला हवा गं, शेजारीन सखेबाई॥ ५ ॥
देव अंगात वागतो, जर शब्दाला जागतो
का भक्त भिक मागतो गं, शेजारीन सखेबाई॥ ६ ॥
उपवासा नवसामुळे, तुझी बुध्दी मातीला मिळं
कसं तुला ना कळ गं, शेजारीन सखेबाई॥ ७ ॥
शेवटी सांगते गं आता, सोड साऱ्या भाकड कथा
जीवनाशी होतात व्यथा गं, शेजारीन सखेबाई॥ ८ ॥
त्या भीमरायानं दिला, एक जीवनमार्ग भला
त्या ज्योतीबानं दिला, एक मार्ग आपुलानवा,
पंचशिलच तारील तुला गं, शेजारीन सखेबाई॥ ९ ॥

– लक्ष्मण केदार

# * साक्षरता गीत *

घरधनी राहिले मी आडाणी
न मला वाचाया शिकवा ।
वाचाया शिकवान् मला लिहाया शिकवा ॥ धृ ॥
पाठी पुस्तक घेऊनी हाती
पोरं समदी शाळाला जाती
मलाबी, शाळंला पाठवा ॥ १ ॥
घेऊनी पिशवी बाजारी जाते
आडानी म्हणून फसून येते
हा हिसाब कसा करु दाखवा ॥ २ ॥
गावाला जाताना गाडीत बसते
गाडीत कोणती ओळखू न येते
या गावाची ओळख पटवा ॥ ३ ॥
बाळ आपला शाळेला जातो
अ आ इ करीत येतो
या बाळाच्या संगतीला मला बी पाठवा ॥ ४ ॥





# * देह मंदिर, चित्त मंदिर *

देह मंदिर, चित्त मंदिर एक तेथे प्रार्थना
सत्य-सुंदर-मंगलाची नित्य हो आराधना ॥ धृ ॥
दुःखिताचे दुःख जावो ही मनाची कामना
वेदना जाणावयाला जागवू संवेदना
दुर्बलाच्या रक्षणाला, पौरुषाची साधना
सत्य-सुंदर -मंगलाची नित्य हो आराधना ॥ १ ॥
जीवनी नव तेज राहो, अंतरंगी भावना
सुंदराचा वेध लागो, मानवाच्या जीवना
शौर्य लाभो, धैर्य लाभो सत्यता संशोधना
सत्य-सुंदर-मंगलाची नित्य हो आराधना ॥ २ ॥
भेद सारे मावळू द्या वैर सा-या भावना
मानवाच्या एकतेची पूर्ण होवो कल्पना
मुक्त आम्ही फक्त मानू बंधुतेच्या बंधना
संत्य-सुंदर-मंगलाची नित्य हो आराधना ॥ ३ ॥

# * जमा खर्च स्वातंत्र्याचा *

जमाखर्च स्वातंत्र्याचा मांडणार केव्हा ।
जाब उंच प्रासादांना मागणार केव्हा ॥ १ ॥
धूर्त शोषकांच्या ओठी घोष संस्कृतीचा ।
चूड इथे या ढोंगाला लावणार केव्हा ॥ २ ॥
विलायती भाषे मधूनी बोलती कुणी ।
माणसास माणूस येथे मनणार केव्हा ॥ ३ ॥
घाम ओतूनी जो पिकवी मळे अमृताचे ।
दिवा झोपडीतून त्यांच्या लागणार केव्हा ॥ ४ ॥
इथे पडे सत्तेभोवती कडे भ्रष्टतेचे ।
काजळी दिव्याभोवतीची झाडणार केव्हा ॥ ५ ॥
किती काळ बघत बसावे फुगे शोषणांचे ।
भास हे भ्रमाचे सारे फोडणारे केव्हा ॥ ६ ॥





# * जात कोणती पुसू नका *

जात कोणती पुसू नका,धर्म कोणता पुसू नका
उद्यानातील फुलास त्याचा रंग कोणता पुसू नका...
पुसू नका, पुसू नका ॥ धृ ॥
हिरवा चाफा, कमळ निळे सुखद सुमनांचे गंध मळे
एकच माळी या सर्वांचा नाव तयाचे पुसू नका ॥ १ ॥
सध्दर्माचा एकच न्याय, कष्टाचा एकच अध्याय
डाव्या उजव्या करास काही भेद मानूनी फसू नका ॥ २ ॥
रहीम दयाळू तसाच राम, मशीद -मंदीर मंगलधाम
जपूनि शांतीचा मंत्र सुखाने , एक दुजाला डसू नका ॥ ३ ॥
जन्मा आली मुले म्हणूनी,भारतभूमीच्या कुशामधूनी
अभेद आम्ही अजिंक्य आम्ही,नाव आमुचे पुसु नका ॥ ४ ॥

# * आभाळाची लेकरे *

आभाळाची आम्ही लेकरे काळी माता आई
जात वेगळी नाही आम्हा, धर्म वेगळा नाही ॥ धृ ॥
श्रमगंगेच्या तीरावरती, कष्टकऱ्यांची आमुची वस्ती
नाव वेगळे नाही आम्हा, गाव वेगळा नाही ॥ १ ॥
इमान आम्हा एकच ठावे, घाम गाळूनी काम करावे
मार्ग वेगळा नाही आम्हा, स्वर्ग वेगळा नाही ॥ २ ॥
माणुसकीचे अभंग नाते, आम्हीच अमुचे भाग्य विधाते
संत वेगळा नाही आम्हा, पंथ वेगळा नाही ॥ ३ ॥
कोटी- कोटी हे बळकट बाहू, जगन्नाथ-रथ ओढून नेऊ
आस वेगळी नाही आम्हा, ध्यास वेगळा नाही ॥ ४ ॥





# * लहू का रंग एक है *

लहू का रंग एक है, अमीर क्या गरीब क्या ।
बने है एक खाक से,तो दूर क्या करीब क्या ॥ धृ॥
वहि है तन,वही है धन,कबतक छुपाओगे ।
पहनके रेशमी लिबास,कि तुम क्या अवर्ण क्या।
सभी है एक जाति हम,सवर्ण क्या अवर्ण क्या ।
लहू का रंग एक है ॥ १ ॥
गरीब है तो इसलिए,कि तुम अमीर हो गए
एक बादशाह हुआ,तो सौ फकीर हो गए ॥
सदा है सब समाज की,भले-बुरे नसीब क्या ।
लहू का रगं एक है ॥ २ ॥
जो एक है तो फिर मन क्यों,दिलो का दर्द बाट लें ।
जिगर की प्यास बाट लें,लोगों की प्यार बाट लें ।
लगा लो सबको तुम गले,अमीर क्या गरीब क्या ।
लहू का रगं एक है ॥ ३ ॥

## * हे असे आहे तरी पण *

हे असे आहे तरी पण,हे असे असणार नाही
दिवस आमुचा येत आहे,तो घरी बसणार नाही ॥ धृ ॥
हे खरे की आज त्यांनी,घेतले सारेच ठोके
पण उद्या त्यांच्या चित्तेवर,एक ही रडणार नाही ॥ १ ॥
सांगती जे धर्म जाती,बांधती ते रोज भिंती
पण उद्याचा सूर्य काही, त्यामुळे फसणार नाही ॥ २ ॥
छान झाले दांभीकाची पंढरी उध्वस्त झाली
यापुढे वाचाळ दिंडी,एकही निघणार नाही ॥ ३ ॥
आजचे आमुचे पराभव, पचविती आम्ही उद्यास्तव
विजयती कसला उरावर,जखम जो करणार नाही ॥ ४ ॥
हे असे आहे तरी पण,हे असे असणार नाही
दिवस आमुचा येत आहे,तो घरी बसणार नाही ॥ ५ ॥





## * साथीयों सलाम *

साथीयों सलाम है,सलाम है सलाम ॥ धृ ॥
इस देश की आजादियाँ है तुम्हे बुला रही
है तुम्हे बुला रही है तुम्हे बुला रही
जातीवादी बेडियाँ झनझनाके आ रही
झनझनाके आ रही झनझनाके आ रही
कबुल ही आजादीयाँ तोड दो ये बेडियाँ
प्रण करो यहाँ सभी करो यहाँ अभी
हमारे ही हाथमें देशकी लगाम है
हमारेही हाथमें देशकी आजादी है
साथीयों सलाम है ॥ १ ॥
धुन समाज में मची दूर तुम उसे करो
दूर तुम उसे करो दूर तुम उसे करो
बुझ रहा जला दिया प्यार से उसे करो
प्यारसे उसे भरो प्यारसे उसे भरो
बुझ रहा जला दिया प्यार से उसे भरो
देश लहलहा उठे भारतीय गा उठे
विश्वमें आवाज है विश्वमें पुकार है
हमारेही हाथमें देशकी लगाम है
हमारेही हाथमें देशकी आजादी है
साथीयों सलाम है ॥ २ ॥

# ✻ संघटना गीत ✻

या ग या ग साऱ्या जणी
मागे नका राहू कोणी
जिवाभावाची ही सखी, संघटना ॥ धृ ॥
कामधाम रातदिन, शिणंलग तन मन,
गारवाऱ्याची झुळूक संघटना ॥ १ ॥
या ग या ग ....
राबते मी किती जरी, नाही काही नावावरी
जाब याचा विचारिते, संघटना ॥ २ ॥
द्वाड भेटलं सासर, काढलं घराबाहेर
हक्काच माझ माहेर
संघटना ॥ ३ ॥
पै... पैचं बिचत वाढलीया माझी पत
विचारीचे माझ मत संघटना ॥ ४ ॥
घटना दुरूस्ती झाली, सरपंचबाई आली
हातामध्ये सत्ता देई संघटना ॥ ५ ॥
धर्म जात पत भाषा भेदभावाच्या या
मिटविण्या शिकविते संघटना ॥ ६ ॥
शेतकरी कामगार, आदिवासी बलूतदार
एकजुटीचा आधार संघटना ॥ ७ ॥
या ग या ग

– वसुधा सरदार





# ✻ भान कुठं विसरून ✻

भान कुठं विसरून आलीस ग ताई
भान कुठं विसरून आलीस गऽऽऽ ॥ धृ ॥
नदिच्या काठी रानोमाळी
कि चुलीच्या धुरात गऽऽऽ
भान कुठं विसरून आलीस गऽऽऽ ॥ १ ॥
मासिक पाळी शरीर धर्म
नाही गोष्ट विटाळाची
पाळीचे कपडे उन्हात वाळव
हि तर बाब साधीशी
भान कुठं विसरून आलीस गऽऽऽ ॥ २ ॥
ताकद येते सारं काही खाऊन
नको सलाईन टॉनिक ग
बसा जेवायला एकत्र सारे
बघ तर वाटतय कसं ग
भान कुठं विसरून आलीस गऽऽऽ ॥ ३ ॥
एक किंवा दोन मुलं हवीत
मुलगाच कशाला हवा गऽऽऽ ।
लेकीचा सन्मान करू या सारे
बघ तर वाटतय कसं ग
भान कुठं विसरून आलीस गऽऽऽ ॥ ४ ॥

– संग्रहित